साठवणीतील गाणी

# सुरांची सम्राज्ञी लता मंगेशकर




डॉ. मृदुला दाढे

राजहंस प्रकाशन

आनंद-सुनीता कमळापूरकर (डोंबिवली), सतीश-स्वाती दाणी (नाशिक),
श्याम गणोरे काका (भगूर-नाशिक), अश्विनी देवधर (पुणे),
अलका सुहास जोशी (ठाणे), पूर्वा मठकर (डोंबिवली) आणि
युसूफचाचा बागवान (सातारा) यांना ही शब्दांजली, प्रेमपूर्वक!

तुम्ही मंडळी माझ्यावर जे निरतिशय प्रेम करता,
त्याची परतफेड अशक्य आहे.

- मृदुला

आठवणीतील गाणी, मनात साठवणीसाठी...

हिंदी चित्रपटसंगीतातली चार लखलखती नक्षत्रे

**आवाजाचा अवलिया - किशोर कुमार**

**नवरसांचा जादूगार - मोहम्मद रफी**

**चिरतरुण स्वर - आशा भोसले**

**सुरांची सम्राज्ञी - लता मंगेशकर**

यातला प्रत्येक क्यूआर कोड तुम्हाला देईल
पंचवीस अप्रतिम गाण्यांचा नजराणा..!

# अनुक्रम


- लतामय मी... / ९
- ... म्हणून ही ‘सुरांची सम्राज्ञी’! / १२

१. बहारें फिर भी आएंगी / ३९
२. वो तो चले गए ए दिल / ४२
३. दुआ कर ग़म ए दिल / ४५
४. फैली हुई हैं सपनों की बाहें / ४८
५. गुज़रा हुआ ज़माना आता नहीं दुबारा / ५१
६. तेरे सुर और मेरे गीत / ५४
७. मैं तुम्हीं से पूछती हूँ / ५७
८. ओ सजना बरखा बहार आयी / ६०
९. मुहब्बत की झूठी कहानी पे रोए / ६३
१०. हाए रे वो दिन क्यूँ ना आए? / ६६
११. ए री जाने न दूँगी / ६९
१२. तुम्हीं मेरे मंदिर तुम्हीं मेरी पूजा / ७२
१३. दिल का दिया जला के गया / ७५
१४. तुम्हें याद करते करते / ७८
१५. कुछ दिल ने कहा / ८१
१६. तू चंदा मैं चाँदनी / ८४
१७. चलो सजना जहाँ तक घटा चले / ८७
१८. छोड़ दे सारी दुनिया किसी के लिए / ९०
१९. रैना बीती जाये / ९३
२०. तेरा मेरा साथ रहे / ९६

२१. आज सोचा तो आँसू भर आए / ९९
२२. आप यूँ फ़ासलों से / १०२
२३. पलभर में ये क्या हो गया / १०५
२४. इक हसीं निगाह का / १०८
२५. दिल हूम हूम करे / १११

---

**आपली आवड**

प्रिय वाचक,

या २५ गाण्यांची निवड लेखिकांनी केलीय. त्या चित्रसंगीताच्या ख्यातनाम जाणकार आहेत. त्यांची निवड छानच आहे. पण तुमच्या आवडीची काही गाणी वेगळीही असू शकतील. 'या पुस्तकात ही गाणी हवीच होती!' असंही तुम्हाला वाटेल. तर वाचकांनी यातल्या कुठल्याही तीन गाण्यांऐवजी स्वत:च्या आवडीची तीन गाणी निवडावीत, आणि तीच का निवडली हे आम्हाला २०० शब्दांत लिहून खाली दिलेल्या ई-मेलवर पाठवावं. तीन सर्वोत्तम लेखांना 'ग्रंथवेध'मध्ये प्रसिद्धी आणि राजहंसतर्फे ग्रंथभेट देण्यात येईल.

ई-मेल : rajhansgranthvedh@gmail.com

---

# लतामय मी...

लता मंगेशकर या आवाजानं माझ्या भावविश्वात नेमका केव्हा प्रवेश केला; हे सांगणं अवघड आहे, कारण स्मृतींचा पट जितका मागे ओढता येईल तेवढा मागे नेला, तरी त्यात 'लता स्वर' व्यापून उरलेलाच आहे. गाणं उमजायला लागलं, तेव्हा या आवाजाच्या अमर्याद ताकदीची आणि या गायिकेच्या लोकोत्तर बुद्धीची जाणीव व्हायला लागली. चाळीसएक वर्षं मी स्वत: एक गायिका म्हणून संगीतक्षेत्रात वावरत असताना अगणित वेळा लताबाईंची गाणी ऐकली, गायली. चित्रपटसंगीत हा माझा अभ्यासविषय झाल्यावर अधिक सूक्ष्म नजरेनं आणि तीक्ष्ण श्रुतींनी मी ऐकायला लागले आणि थक्क होणं, नव्यानं थक्क होत राहणं, एवढंच हाती उरलं!

'लता' हे एक कोडं आहे. जितकं सोडवायला जाऊ, तितकं आवाक्याबाहेर जाणारं. सामान्य रसिक म्हणून 'वाह' म्हणणं आणि पुढच्या जटिल कामगिरीतून स्वत:ची सुटका करून घेणं सोपं एक वेळ! परंतु गाणं कळायला लागलं, की 'लता' जास्त भिडत जाते, अनेक अर्थांनी भिनत जाते, व्यापून टाकते, या सगळ्याचं आकलन होऊन, त्याचं वर्णन करेपर्यंत त्या अनुभवांची तीव्रता कायम राहणं अशक्य वाटू लागतं. सुनीताबाई देशपांडे म्हणतात तसं, कुठलाही आस्वाद हा एकदाच घडतो. त्या वेळी असलेली मानसिक अवस्था, त्या अनुभवाला भिडण्याची असोशी तशीच्या तशी पुन्हा असत नाही. तुम्हीही 'ते'च नसता आणि मग ती अनुभूतीही एकसारखी राहू शकत नाही. किती खरं आहे! परंतु लताबाईंचं गाणं असंख्य वेळा वाजत राहिलं, तरी आपल्या मन:स्थितीच्या मर्यादा ओलांडून आपल्याला वेगळ्या दुनियेत नेण्याची जबरदस्त ताकद त्यात आहे, हे जाणवल्यापासून या गायकीचा वेध घ्यावा; हा विचार प्रबळ झाला.

लता मंगेशकर या विषयावर अनंत वेळा लिहून, बोलून झालेलं असताना नव्याने मी काही लिहावं, असं काय उरलं आहे? या प्रश्नाचं उत्तर देणं कठीण

आहे. पण लता या आवाजातच अमर्याद शक्यता असल्यानं मी हे धाडस करते आहे. लताबाईंच्या गायकीबाबत आपण सगळे तीन अवस्थांतून जातो. त्यांच्या उत्तम गाण्यांचा उल्लेख करणं, भारावून जाणं, आणि चमत्कार म्हणून सोडून देणं! हे अटळ आहे! एखाद्या संगीतज्ञाच्या लक्षात एखादी सूक्ष्म गोष्ट येत असेलच, पण ती उलगडून सांगावी अशी ना त्याला गरज असते ना सामान्य श्रोते त्याच्यापर्यंत पोचू शकत. मग असे रसिक या आनंदापासून वंचितच राहणार का? हा प्रश्न मला छळू लागला आणि या प्रकारच्या लेखनाची किती गरज आहे, हे मला जाणवलं. माझ्या बाबतीत फरक इतकाच झाला की, त्या अनुभवांची नोंद घेऊन त्यामागचं सौंदर्यतत्त्व शोधण्याचं वळण माझ्या बुद्धीला मी लावू शकले आणि मंचीय सादरीकरण करणारी एक गायिका असल्यानं थेट उलगडूनही दाखवू शकले. काही जागा किती अवघड आहेत, श्वास पुरवणं कसं कठीण आहे, एखादा स्वर ताकदीनं धरून ठेवणं किती मुश्कील आहे हे गातानाच समजत असतं. त्यामुळे स्वत: गायिका असण्याचा मला नक्कीच उपयोग झाला. 'अमरलता' या माझ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून सामान्य श्रोत्यांपर्यंत ही गायकी पोचवताना त्यांच्या प्रतिक्रिया, चेहऱ्यांवरचे भाव, एक नवीन आनंद-निधान गवसल्याचा आनंद काही और होता. पण हे सगळं लिखाणातून पोचवणं हे महादिव्य होतं. प्रत्यक्ष गाणं आणि लिहून सांगणं यातला फरक राहणारच. हे मान्य करूनच हा प्रयत्न केला आहे. विश्लेषण हे विच्छेदन होऊ नये, ही काळजी मी घेतली आहे. गाणं ऐकत ऐकतच हे लेख वाचावेत, अशी मी विनंती करते. पंचवीस गाण्यांची निवड हा एक वादाचा मुद्दा ठरू शकतो. शक्यतो विविध संगीतकारांकडे बाईंनी गायलेली लोकप्रिय गाणी असावीत, असा विचार आम्ही केला आहे. तुमच्या आवडीची अनेक गाणी यात नसू शकतात, त्याबद्दल क्षमस्व! पण गायकीतलं तत्त्व महत्त्वाचं आहे, ते अन्य गाण्यांतही लागू आहे; हे कृपया वाचकांनी समजून घ्यावं.

लताबाईंवर हे लेखन करण्याआधी, 'नवरसांचा जादूगार मोहम्मद रफी' हे पुस्तक मी लिहिलं. या दोन दिग्गजांच्या कार्याचा लागोपाठ अभ्यास करताना एक गोष्ट लक्षात आली की उत्तम काव्यमूल्य असलेली, वजनदार शायरीची जास्त गाणी रफीसाहेबांच्या वाट्याला गेली आहेत आणि नायिकांची, पर्यायानं लताबाईंची जास्त गाणी ही हलकीफुलकी, साध्यासोप्या प्रतिमा असलेली आहेत. म्हणजे जो नीरज रफीसाठी 'एक तार की दूरी है दामन में और कफन में'सारखी जाळत जाणारी ओळ लिहितो, तो बाईंसाठी 'आज मदहोश हुआ जाए रे' किंवा 'मेघा छाए आधी रात' असं सोपं लिहितो. अशा वेळी गायिकेवरची, आवाजातून अनेक सुप्त भावना व्यक्त करण्याची जबाबदारी वाढते. अर्थात

याला सन्माननीय अपवाद आहेत.

या पुस्तकात जी निरीक्षणं मी मांडली आहेत, ती सर्वस्वी माझी वैयक्तिक मतं आहेत. यात मला लताबाईंची गायकी समजली आहे, असा यत्किंचितही दावा नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. रसिक श्रोत्यांच्या आनंदालाही एक वळण लागावं, गाण्यातल्या अनेक खुब्या समजाव्यात, हाच माझा प्रयत्न आहे. जे आधीच जाणकार आहेत, त्यांनाही कदाचित एखादा वेगळा पैलू जाणवू शकतो किंवा त्यांच्या निरीक्षणाला दुजोरा मिळू शकतो. सर्जन आधीच घडलं आहे. मी कोण? केवळ एक माध्यम...!

राजहंस प्रकाशनाचे श्री. दिलीप माजगावकर, डॉ. सदानंद बोरसे आणि श्री. शिरीष सहस्रबुद्धे यांनी, साक्षात लताबाईंवरच्या पुस्तकाची जबाबदारी माझ्यावर सोपवून जो विश्वास दाखवला, त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. या पुस्तकासाठी ज्यांनी अपार मेहनत घेतली, त्या राजहंस प्रकाशनाच्या सर्व टीमचे मी मनापासून आभार मानते. या मालिकेतील सर्व शंभर गाण्यांच्या प्ले-लिस्ट तयार करणारे संगीतज्ञ श्री. सुहास किर्लोस्कर, सगळ्या गाण्यांची क्यूआर कोड्स करणाऱ्या सौ. वैशाली जोशी, रफी व लताची छायाचित्रं मिळवून देणारे मित्र सुश्रुत कुलकर्णी, मुखपृष्ठकार तृप्ती देशपांडे आणि निर्मितीप्रमुख श्री. शिरीष शेवाळकर व त्यांची पूर्ण टीम यांचा विशेष उल्लेख करायला हवा. माझे आईवडील, डॉ. प्रफुल्ल आणि सौ. सुचेता दाढे, माझी भावंडं सौ. श्रीया परळीकर, डॉ. प्रसाद दाढे, माझी मुलं डॉ. रमणी आणि चि. ऋत्विज यांची मला प्रत्येक कार्यात सक्रिय साथ असतेच. हे लिखाण एक विशिष्ट कालमर्यादेत पूर्ण करणं म्हणजे एक शिवधनुष्य पेलणंच होतं. माझे सहकारी श्री. उदय मठकर यांच्या अमोल सहकार्याशिवाय मला हे काम पूर्णत्वाला नेणं अत्यंत अवघड होतं. जिथे मी संगीत विषयाचं अध्यापन करते, त्या मुंबई विद्यापीठाच्या संगीत विभागाचे प्रमुख डॉ. कुणाल इंगळे आम्हाला नेहमीच सहकार्य देत असतात. या सर्वांना मी मनापासून धन्यवाद देते.

लताबाईंचा आवाज ऐकताना कैकदा मनात येतं, की यानंतर काही ऐकूच नये... स्तब्ध बसावं. ते गाणं भिनवून घ्यावं आणि मनोमन त्या ईश्वराला हात जोडावे... यासाठी की हा दिव्यस्वर ऐकणं, ही जिवंत दंतकथा अनुभवणं आपल्या भाग्यात होतं! हे पुस्तक वाचत वाचत गाणी ऐकताना हा अनुभव तुम्हालाही यावा!

कृष्णार्पणमस्तु!

**डॉ. मृदुला दाढे**

# ...म्हणून ही ‘सुरांची सम्राज्ञी’!

लता मंगेशकर! या आवाजाच्या अस्तित्वानं आपलं हे सहस्रक पुनीत झालं. या आवाजानं आपलं बालपण, तारुण्य यातले कित्येक सोनेरी क्षण आपल्याला बहाल केले... ‘जीने का बहाना’ म्हणता येईल असा सुरेख अर्थ जगण्याला दिला, अश्रू पुसले. स्वत्वाची जाणीव दिली. अपमान, दु:ख, वंचना या भावना समजून घेताना हाच आवाज पाठीवर हात ठेवत होता.. तारुण्यातले कित्येक तरल क्षण या आवाजालाच सांगितलेत आपण. रस्ता दिसू नये.. आपण दिशाहीन व्हावं.. कुणाशीच बोलावंसं वाटू नये, अशा वेळी फक्त आणि फक्त या आवाजालाच ‘आत’ प्रवेश होता.

लता मंगेशकर म्हणजे विश्वाच्या निर्मात्यानं, हे विश्व निर्माण केल्याबद्दल स्वत:लाच दिलेलं बक्षीस! या सम्राज्ञीपुढे ठेवलेल्या बाराही अलंकारांना तिनं स्वत:च्या गळ्यात मानाची जागा दिली... त्यांना खुलवलं. त्यांना स्वत:च्या अस्तित्वाचा अभिमान वाटावा अशा डौलात, अशा दिमाखात वाढवलं... आणि ते स्वर या राणीच्या गळ्यात असे काही बहरले, की त्याची जागा विश्वातला कुठलाही गळा, कुठलंही वाद्य कधीच घेऊ शकलं नाही.. कारण या गळ्यातली स्वरवेल जेव्हा थरथरली, तेव्हा कुठल्यातरी अनामिक दैवी सुगंधाची फुलंच ओठांवर उमलली. या आवाजाची व्याख्या करण्याच्या फंदात शहाण्यांनी पडू नये, कारण शब्दांत बांधायला तो काही कुठला धातू नव्हे, किंवा भूमितीचं प्रमेय नव्हे.. ‘लता’साठी भाषासुद्धा नवीच जन्माला घालावी.. उपमाही नव्याच... कारण त्या आवाजाची लिपीच वेगळी आहे... कष्टात घालवलेलं बालपण म्हणजे लता नव्हे.. वाटेल तिथे पोचू शकणारा गळा म्हणजे लता नव्हे.. भावनेचे पदर उलगडू शकणारा लवचीक आवाज म्हणजे लता

नव्हे.. सूक्ष्म हरकती, मुरक्या स्वच्छ ऐकू येणं म्हणजे लता नव्हे.. ऐकणाऱ्याचा श्वास कोंडावा, असा दमश्वास म्हणजे लता नव्हे.. दोन ओळींत लपलेला भावार्थ आपल्या आवाजात अचूक दाखवण्याचं कसब म्हणजे लता नव्हे आणि प्रत्येक अभिनेत्रीसाठी वेगळा टोन आवाजात आणू शकणं म्हणजेही लता नव्हे.. लता म्हणजे या सगळ्या गोष्टींचं एकत्र येणं अन् तेही योग्य प्रमाणात! म्हणूनच ते गाणं रुक्ष हरकतींनी कोरडं होत नाही... नुसतंच तुम्हाला दम कोंडून अचंबित करत नाही. अतिलाडिक होत नाही. अतिभावबंबाळ नाटकी होत नाही. गायन या विषयातल्या सगळ्या सौंदर्यकल्पना एकत्र येऊन घडवलेलं प्रमाणबद्ध शिल्प आहे लता मंगेशकर.

काही आवाज 'आपल्यातले' वाटतात.. काही आवाज किंचित परके, पण तरीही हवेहवेसे, तर काही आवाज 'इथले' नाहीत हे कळूनही 'त्या' दुनियेशी आपलंही नातं जोडण्याच्या विलक्षण ताकदीचे. लता हा आवाज 'त्या' प्रकारचा. संगीत हे परमेश्वरापर्यंत पोचण्याचं साधन असेल, तर त्या प्रवासाला स्वत:चा मखमली रस्ता दिला या आवाजानं. सगळा खडबडीतपणा स्वत:च्या त्या मुलायम आवाजाखाली दडवून हा रस्ता केशराच्या शेतातून नेला. आपल्या पायाखाली सतरंजी असण्याचीसुद्धा पात्रता नसणाऱ्यांसाठी पायाखाली गुलाबाच्या पाकळ्या अंथरल्या त्या या आवाजानं. त्या आवाजाला 'दैवी' हे विशेषण आपण लावतो. पण देवाचा आवाज आपण ऐकलाय का? मग लताबाईंचा आवाज दैवी कसा? तर देवालासुद्धा आपला आवाज 'असा' असावा, असं वाटायला लावणारा हा आवाज..!

लता दीनानाथ मंगेशकर! या शब्दांना नादविश्वात मंत्रोच्चाराचं स्थान आहे. काही दिवस हे शास्त्रीयदृष्ट्या आधीच शुभ असतात, तर काही दिवस एखाद्या महत्त्वाच्या घटनेमुळे शुभ मानले जातात. २८ सप्टेंबर १९२९ या दिवशी एका अलौकिक, दिव्य, लोकोत्तर आवाजानं या पृथ्वीवर जन्म घेतला आणि हा दिवस शुभ ठरला. तत्कालीन मध्य भारतात, इंदौर शहरात या गानसरस्वतीनं मनुष्यजन्म घेतला.

लताबाईंचे पिताश्री मा. दीनानाथ मंगेशकर हे ख्यातनाम शास्त्रीय संगीत गायक, तसेच रंगभूमीवरील नामवंत गायक नट! या गोमंतकीय दाम्पत्याचं हे पहिलं अपत्य. एकूण पाच मुलांमधील लताबाई या थोरल्या. या मुलीचं नाव, आधी 'हेमा' असं ठेवलेलं होतं. तिला मा. दीनानाथ, प्रेमाने 'हृदया' असंही म्हणत. लताबाईंच्या कानांवर, लहानपणापासून उत्तम गायकीचे संस्कार झाले, यात काही आश्चर्य नाही.. परंतु औपचारिकरीत्या, बाबांकडे त्या वयाच्या पाचव्या वर्षांनंतर शिकू लागल्या, नाटकांमधून कामं करू लागल्या. याच सुमारास

एक महत्त्वाची घटना घडली, ती म्हणजे १९४१ साली आलेल्या 'खजान्ची' या चित्रपटाच्या निमित्तानं घेतलेल्या स्पर्धेत या जेमतेम दहा-अकरा वर्षांच्या मुलीनं मिळवलेलं पहिलं बक्षीस! या चित्रपटाचं संगीत होतं गुलाम हैदरसाहेबांचं! त्या वेळी जिंकलेला तो दिलरुबा म्हणजे एक शुभशकुन होता.. नियतीनं या आवाजाच्या स्वागताची तयारी सुरू केली होती. गुलाम हैदरसाहेबांना तेव्हाच या आवाजाचं वेगळेपण जाणवलं होतं, त्यांनी शहीद चित्रपटासाठी एक गाणं ध्वनिमुद्रितही केलं, परंतु 'हा आवाज फार पातळ आहे, चालणार नाही' या कारणास्तव फिल्मीस्तानच्या निर्मात्यांनी ते नाकारलं. गुलाम हैदरजी व्यथित झाले, पण ''आज तुम्ही हा आवाज नाकारताय, पण लवकरच अशी वेळ येईल, की तुम्ही सगळे, लतानं आपल्यासाठी गावं म्हणून रांगेत उभे राहाल!'' अशी भविष्यवाणी करायला ते विसरले नाहीत.. त्यांच्या मुखातून नियतीच बोलत होती जणू.

दरम्यान मा. दीनानाथ यांचं १९४२ साली अचानक निधन झालं आणि कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी वयानं लहान असलेल्या लतावर येऊन पडली. अवघ्या तेरा वर्षांच्या असल्यापासून लताबाईंनी संघर्ष केला. अस्तित्वाची ही लढाई त्यांना खूप काही शिकवून गेली.. सुप्रसिद्ध निर्माते, दिग्दर्शक, आणि अभिनेते मा. विनायक हे मा. दीनानाथांचे मित्र. कुटुंबाला तातडीची आर्थिक निकड असल्यानं त्यांच्याच चित्रपटांसाठी लताबाईंनी काम सुरू केलं, काही चित्रपटांत अभिनय केला. पहिली मंगळागौर, माझं बाळ, अशा चित्रपटांत छोट्या भूमिका त्यांना कराव्या लागल्या. 'पहिली मंगळागौर' (१९४२) या चित्रपटातलं बाबुराव गोखले यांनी लिहिलेलं आणि दादा चांदेकरांनी संगीतबद्ध केलेलं 'नटली चैत्राची नवलाई' हे त्यांचं पहिलं मराठी चित्रपटगीत मानलं जातं.

भेंडीबझार घराण्याचे उस्ताद अमानअली खाँ साहेब, उस्ताद अमानतअली खां (देवासवाले) आणि बडे गुलाम अली यांचे शिष्य पं. तुळशीदास शर्मा या गुरूंकडे लताबाई शास्त्रीय गायन शिकल्या. शास्त्रीय गायनातच नाव मिळवण्याची त्यांची इच्छा होती. पण करोडो भारतीयांच्या कुंडलीत या आवाजानं कान तृप्त करून घेण्याचं भाग्य होतं, त्यामुळे सामान्यातल्या सामान्य व्यक्तीपर्यंत पोचू शकणाऱ्या हिंदी चित्रपटसंगीताची सरशी झाली. हिंदी पार्श्वगायन क्षेत्रात लताबाईंचा प्रवेश १९४६ साली झाला. संगीतकार दत्ता डावजेकर यांचं 'पा लागू कर जोरी रे,' हे त्यांचं ध्वनिमुद्रित झालेलं पहिलं हिंदी चित्रपटगीत. चित्रपट होता, 'आपकी सेवा में'. हा एक ऐतिहासिक क्षण होता. या मुलीचं वय अवघं सतरा! किडकिडीत देहयष्टी, आवाजात निरागस कोवळीक! आसमंतात भरून राहिलेल्या शमशाद बेगम, नूरजहाँ, जोहराबाई अंबालावाली, सुरैय्या अशा

भारदस्त आवाजांच्या पार्श्वभूमीवर भविष्यकाळात स्वत:चा नवा इतिहास रचणारा, नवं घराणं निर्माण करणारा आणि भारतीय जनतेच्या रक्तातून अखंड वाहणारा एक आवाज उदयाला आला होता.

अशातच देशात अनेक घडामोडी झाल्या. फाळणी झाली, त्यामुळे भारतातून अनेक कलाकार पाकिस्तानात गेले, त्यातच एक होत्या नूरजहाँ. त्यांच्या जाण्यामुळे उत्तम पार्श्वगायिकेची उणीव निर्माण झाली. एकदा हुकलेली संधी गुलाम हैदरसाहेबांना पुन्हा मिळाली आणि पूर्वी लक्षात राहिलेल्या या गायिकेकडून त्यांनी 'मजबूर' चित्रपटासाठी गाऊन घेतलं. 'दिल मेरा तोड़ा मुझे कहींका न छोड़ा' हे गाणं, गुलाम हैदरसाहेबांनी गोरेगाव स्टेशनवर पोरसवदा लताला शिकवलं! किती शुभसूचक क्षण असेल तो! संपूर्ण संगीतक्षेत्रात उलथापालथ करणारी घटना होती ही. त्यानंतर, १९४८-४९ या कालावधीत या आवाजानं आपलं गारुड संपूर्ण देशावर पसरलेलं होतं. अनिल बिस्वास, खेमचंद प्रकाश, नौशाद, सी. रामचंद्र, श्यामसुंदर, हुस्नलाल-भगतराम या संगीतकारांनी स्वत:ची गाणी या नव्या मुलीकडून गाऊन घेतली. अनिल बिस्वास यांनी या गायिकेच्या, मुळात तयारीच्या आवाजाला घासूनपुसून लखलखीत केलं. जणू या हिऱ्याला त्यांनी पैलू पाडले. माइकवर कसं गावं, श्वास कुठे घ्यावा, तो ऐकू जाऊ नये म्हणून काय करावं; अशा अनेक गोष्टी अनिलदांनी लताबाईंना शिकवल्या. लताबाईंनीही उर्दू उच्चारांवर परिश्रम घेऊन ते निर्दोष केले.

लताबाईंच्या कारकीर्दीला महत्त्वाचं वळण देण्यात खेमचंद प्रकाश यांच्या 'आयेगा आनेवाला' या गाण्याचा खूप मोठा वाटा आहे. 'महल' चित्रपटाचं गूढ वातावरण या गाण्यानं अधिकच गडद केलं आणि हा आवाज चर्चेत आला. सुरुवातीच्या, 'खामोश है ज़माना' या ओळीपासून लताबाईंचा आवाज एक धूसर अनामिक भीती घेऊनच उमटला. हळूहळू प्रत्येक संगीतकाराला लताबाईंचा आवाज स्वत:च्या गाण्यांसाठी आवश्यक वाटू लागला. एका इतिहासाची ही सुरुवात होती.

लताबाईंचा आवाज नेमका आहे कसा? क्षणभर भारावलेपण बाजूला ठेवून या आवाजाची माहिती घेऊ. तांत्रिक भाषेत, लताबाईंचा आवाज हा soprano (सोप्रानो) जातीचा म्हणजेच अत्यंत वरच्या पट्टीत गाऊ शकणारा, पातळ आणि तीक्ष्ण मानला जातो. मायक्रोफोनवर तो अत्यंत नेमकेपणाने पडेल, असं तंत्र लताबाईंनी आत्मसात केलं. म्हणूनच त्या एवढी वर्षं अथकपणे गाऊ शकल्या. त्यांच्या श्वासाचा आवाज ऐकू येत नाही, कारण श्वास आणि उच्छ्वास यांच्या नेमक्या जागा, ठरावीक पद्धतीने घडणारं उदरश्वसन यांवर

त्यांनी खूप परिश्रम घेतले आणि प्रयोगही केले. पराकोटीचा सुरेल असा हा आवाज आहे. आवाजाच्या पडद्यांचा योग्य तऱ्हेनं केलेला वापर, हेसुद्धा त्यांचं अत्यंत महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे. तालाच्या चौकटीत राहूनही स्वातंत्र्य घेऊन गाणं, शब्दांची अर्थानुरूप मांडणी करणं, आवाज 'फेड इन फेड आउट' करणं, विशिष्ट ठिकाणी ठहराव घेणं; अशी त्यांच्या गायकीची अगणित वैशिष्ट्यं सांगता येतील.

लताबाईंच्या गाण्यात कसलाही 'अभिनिवेश' नाही. 'मी गाणं गाते आहे', आणि 'मी म्हणजेच हे गाणं'.. यात फरक आहे! आवाजाचे पडदे वापरण्याचं कसब बाईंच्या प्रत्येक गाण्यात दिसतं. शब्द उत्पन्न होणं, प्रस्थापित होणं आणि विलय होणं ही प्रक्रिया ओंकारासारखीच होत असते. 'लग जा गले' हे त्याचं समजायला सोपं उदाहरण. 'जा' वरचा पूर्ण आकार, रात म्हणताना 'रा'चा खुला आकार पण 'त' हे अक्षर बारीक आवाजात असणं, याच तंत्राचा भाग आहे. शेवटी, 'गले'चा एऽऽऽ कार तीनदा, तीन पडद्यांवर गायला आहे.

गाण्यात एखादा शब्द जास्त भरीव उच्चारणं, याचंही लताबाईंचं एक तंत्र होतं. म्हणजे 'जो हम ने दास्तान अपनी सुनायी आप क्यूँ रोएँ?' म्हणताना 'आप'वरचा जोर लक्षणीय आहे. हाच जोर दुसऱ्या वेळी 'क्यूँ'वर जातो. वाक्याचा अर्थाचा रोख त्यामुळे आपसूक बदलतो.

लताबाईंचे उच्चार स्पष्ट असूनही कोरडे नसत. गोडवा सांभाळताना अतिरेकी लाडिक बालिशपणा त्यात कधीही नव्हता. 'देखो जी बहार आयी' हे नितांतसुंदर गाणं त्या गोड उच्चारांसाठी नीट ऐकावं. 'देखो जी' ही सुरुवातच कहर गोड. 'जा री जा री ओ कारी बदरिया'मध्ये 'मत बरसो'ची मधाळ गोलाई कानाला गुदगुल्या करते.

लताबाईंचे काही खास शब्द, म्हणजे हम, हवा, भरी, आणि रात. प्रत्येक वेळी वेगळी छटा दिसते त्यात. 'हम' या शब्दाचा असा भरीव घुमारदार उच्चार करावा तो लताबाईंनीच. 'तुम न जाने किस जहाँ में खो गए', 'हम भरी दुनिया में तनहा हो गए' यातला 'हम' ऐकावा. 'भरी' दुनिया में म्हणताना खरोखर सगळं जग येतं त्यात. 'दमभर जो उधर' मधला 'दमभर', 'दिलबर दिलसे प्यारे'मध्ये 'दिखलाऊँ बैया भरी भरी'; हे उच्चार कमालीचे भरीव.

'हवा'मधला 'ह' आणि हम किंवा 'लहराये'मध्ये येणारा 'ह' हे सारखे नसतात. ठंडी हवाएं, हवा में उडता जाये, सुन जा आ ठंडी हवा.. यातले 'ह' उच्चारताना बाई त्यात जास्त उच्छ्वास वापरतात. त्यात ती झुळूक स्पर्शून जाते.

'रात' या शब्दालाच मुळात किती अर्थ आहेत. संदर्भानुसार अर्थ बदलतो

# लता-दर्शन



*नर्गिस, राज कपूर आणि लता तिघांचाही ऐन उमेदीच्या काळातला फोटो*



*लक्ष्मीकांत आणि प्यारेलाल यांच्या संगीतसंयोजनात एका जाहीर कार्यक्रमात गाताना किशोर कुमार आणि लता मंगेशकर*



*लतादीदी, गीतकार-कवी-दिग्दर्शक गुलजार आणि आशा भोसले*



'महल' (१९४९) या चित्रपटाचे संगीतकार खेमचंद प्रकाश यांच्या 'आयेगा आनेवाला' या गाण्याने तरुण लताबाईंना कारकीर्दीतलं पहिलं उदंड यश मिळवून दिलं...

## २. वो तो चले गए ए दिल

वो तो चले गए ए दिल यादों से उन की प्यार कर
जीने में क्या मज़ा रहा मौत का इंतज़ार कर!

तुझको खुशी से क्या गरज़ ग़म है तेरे नसीब में
खुशियों की आस छोड़ दे ग़म को गले का हार कर!

भूल जा दिन बहार के देख न ख़्वाब प्यार के
दिल तो निसार कर दिया जान भी अब निसार कर!

---

चित्रपट : संगदिल (१९५२)
गीतकार : राजेंद्र कृष्ण
संगीतकार : सज्जाद हुसेन

---

कमला आणि शंकर, यांची बालपणीपासूनची जोडी. पण अनेक घटना अशा घडतात, की कमला व्यथित होते. आणि आपल्या प्रेमाला काहीच भवितव्य नसल्याचं तिला जाणवतं. आता आपल्या आयुष्यातून शंकर कायमचा निघून गेला, या वेदनेतून आलेलं हे गाणं! राजेंद्र कृष्ण यांची अतिशय प्रवाही भाषा आणि सज्जादसाहेबांची कठीण सुरावट लताबाईंनी अजरामर करून ठेवली. सज्जाद हुसेन हे अत्यंत प्रतिभाशाली संगीतकार, परंतु त्यांच्या संगीतापेक्षा त्यांच्या विक्षिप्तपणाचीच चर्चा जास्त झाली हा दैवदुर्विलास!

वो तो चले गये! 'गेला सोडून तो! पुन्हा परतून न येण्यासाठी! आता केवळ त्याच्या आठवणींवर जगायचं!'

सज्जादसाहेब 'वो', 'तो' या दोन अक्षरांनाच कारुण्यात पूर्ण भिजवतात.

# ६. तेरे सुर और मेरे गीत

तेरे सुर और मेरे गीत, दोनों मिल कर बनेगी प्रीत!

धड़कन में तू है समाया हुआ, खयालों में तू ही तू छाया हुआ
दुनिया के मेले में लाखों मिले, मगर तू ही तू दिल को भाया हुआ
मैं तेरी जोगन, तू मेरा मीत! दोनों मिलकर बनेगी प्रीत

मुझ को अगर भूल जाओगे तुम, मुझ से अगर दूर जाओगे तुम
मेरी मुहब्बत में तासीर है, तो खिंच के मेरे पास आओगे तुम
देखो, हमारी होगी जीत, दोनों मिलकर बनेगी प्रीत!

चित्रपट : गूंज उठी शहनाई (१९५९)
गीतकार : भरत व्यास
संगीतकार : वसंत देसाई

किशन आणि गोपी... लहानपणापासून एकत्र बागडलेली जोडी... किशनच्या शहनाईनं गोपी तहानभूक विसरते. त्यांचं एकमेकांशी असलेलं प्रेमाचं घट्ट नातं त्या सप्तसुरांच्या साथीनंच बहरलंय. किशनच्या प्रेमात आकंठ बुडलेली गोपी मनातलं सांगते आहे, माझ्या आयुष्याचं संगीत तुझ्याच स्वरांच्या साथीनं फुलणार आहे.

हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातला एकेक राग म्हणजे सर्जनाच्या अगणित शक्यता असलेला जणू विशाल वृक्ष, एक एक शाखा ज्या दिशेनं झेप घेईल तिथे तिचा विस्तार होईल! वसंत देसाई हे शास्त्रीय संगीताचे भोक्ते, त्यांच्या प्रत्येक गाण्यात एखाद्या रागाची डूब दिलेली असते... पण केवळ रागाचा

अभ्यास इथे पुरेसा नसतो तर सुरावटीतून निर्माण होणारा मूड, विशिष्ट तऱ्हेने शब्द अधोरेखित करणं, यालाही खूप महत्त्व असतं. म्हणून रागाच्याही पलीकडे ज्यांना जाता आलं, त्यांनाच शास्त्र आणि कला, तंत्र आणि प्रासादिकता, व्याकरण आणि सौंदर्य यांचा मेळ घालता आला. भरत व्यास यांचं काव्य नेहमीच अभिजात, सुसंस्कृत, सोज्ज्वळ, अस्सल भारतीय! रागसंगीतात ते साजून दिसलं. साक्षात उस्ताद बिस्मिल्ला खानसाहेबांच्या शहनाईचा सुवर्णस्पर्श लाभलेलं हे गाणं म्हणजे बिहाग रागाचा एक अनुपम आविष्कार आहे.

लताबाईंच्या आवाजातली मिठ्ठास, त्यांच्या कुठल्याही गाण्यात अपरिहार्यपणे अनुभवता येतेच, कारण गोडवा हा त्यांच्या आवाजाचा स्थायिभावच होता, तरीही, काही गाण्यांत हा आवाज पराकोटीचा गोड, माधुर्याची परिसीमाच असावी, इतका मधाळ लागला. हे गाणं त्यापैकीच. त्या सुखसंगीतात या आवाजाची मिठास मिसळल्याने संपूर्ण अनुभव विलक्षण सुकून देणारा ठरलाय.

सुरुवातीचं ते गुणगुणणं.. त्यातून फुलणारा आलाप किती चैनीत गायल्यात बाई... नीट ऐकल्यावर त्यात लयीशी केलेला खेळही लक्षात येतो. तालाचे कप्पे बाईंना कधीही जाचक वाटले नाहीत. तालाचा मान राखत, त्याला स्वत:मध्ये भिनवत बाई गायल्या. असं वाटतं, की तालात त्यांना बाकीच्यांपेक्षा जास्त मात्रा मिळत होत्या की काय? हातावर ताल देऊन हा आलाप ऐकलात, तर हा मुद्दा चांगला समजेल. तालात गायचं, पण तालाला घाबरून नाही... हे बाईंच्या गाण्यात उमगतं.

तेरे सुर और मेरे गीत, दोनों मिलकर बनेगी प्रीत यातले गीत, प्रीत हे शब्द किंचित वर उचलण्याची कल्पना बहुधा बाईंचीच असावी. खरोखर कानाला गुदगुल्या होतील, इतकं भन्नाट गोड आहे हे. दोनोंवरची छोटीशी तान फार उत्कट.

माझ्या स्पंदनांमध्ये तूच, माझ्या ध्यानीमनी तूच. माणसांच्या या अफाट गर्दीत तूच मनाला भावलास, जन्मोजन्मीचा सखा झालास... तुझी जोगीण होऊन तुझ्याबरोबर राहीन मी! 'मगर तू ही तू'पासून 'मैं तेरी जोगन' हे एका श्वासात गाणं, स्वरांची गोलाई कुठेही कमी न होता! हे एकच आवाज करू शकत होता!

बिहाग राग मुळात गोड. त्यातली नुसती एक स्वरावली पुन्हा पुन्हा घेतली, तरी सुंदर स्वरवाक्यं तयार होतात. इथेही कमीत कमी स्वरांत या ओळी देसाई बांधतात. आणि संगीतकाराचा विचार समजून घेत, त्या सुंदर शिल्पाला धक्का न लावणारी गायकी कशी असते, ते बाईंच्या गाण्यात उमजतं. कुठेही अवास्तव आविर्भाव नाही. हरकती नाहीत... निखळ स्वरानंद!

काव्यात पेच नाहीत, चालीत चमकदार जागा नाहीत. सतत पाठराखण करणारी बासरी सोडली, तर मोठा वाद्यमेळही नाही. तालही नाजूक पावलांनी हलकी सोबत करणारा! मग आहे काय या गाण्यात? तर अर्थ आणि भूमिका समजून निवडलेला स्वत:चा आवाज, तो एकदा खुला लावणं, पुढच्याच क्षणी त्याला संयमाच्या बेड्या घालणं! गाणं संपल्यावर ही त्या गाण्याची किलबिल मनात रेंगाळणं... विचारांच्या अनेक मुक्या कळ्या उमलू पाहणं!

दवाचा थेंब तळव्यावर झेलावा आणि त्याला धक्का लागू नये म्हणून जपावं, तसं या गाण्याला ओंजळीत धरून न्याहाळावं! तितकंच नाजूक आहे ते!

♫



*गाण्याच्या रेकॉर्डिंगच्या प्रसंगी संगीतकार-गायक हेमंत कुमार आणि लताबाई. डाव्या कोपऱ्यात सुदैवी नायक विश्वजित!*